# कारागृह वार्तापत्र



नाताळ व नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
येणारे नवीन वर्ष आपणास सुख समाधानाचे,आनंदाचे,ऐश्वर्याचे,आरोग्याचे जावो.
नवीन वर्षात आपले जीवन सुखमय होवो,अशी श्रीचरणी प्रार्थना...

## संपादकीय संदेश



प्रिय मित्रांनो,

मी नुकताच कारागृह विभागाच्या प्रमुखपदी रूजु झालो आहे. "सुधारणा व पुनर्वसन" हे महाराष्ट्र कारागृह विभागाचे ब्रीद वाक्य आहे. कारागृहातील गुन्हेगारांच्या वैचारिक व वर्तणूकीत सुधारणा करुन समाजात त्यांचे योग्य प्रकारे पुनर्वसन करणे हे कारागृह विभागाचे ध्येय आहे. कारागृहांची स्थापना करण्यामागील महत्त्वाचा उद्देश म्हणजे कायद्याच्या विरुध्द वर्तन करुन गुन्हा करणा-या गुन्हेगारांना समाजाच्या शांतता व स्वास्थ्यतेच्या दृष्टीने काही काळ एकांतवासात ठेवणे हा होय. तसेच गुन्हेगारांचे सुधारणा व पुनर्वसन करणेबाबत योजनाबध्द कार्यक्रम तयार करणे. बंदीमध्ये साधारणपणे वैचारिक सुधारणा घडवून आणणे, सुयोग्य वर्तणूकीबाबत मार्गदर्शन व प्रबोधन करणे, शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षणाव्दारे बंदीमध्ये सतत सुधारणा घडवून शिक्षा उपभोगल्यानंतर समाजात एक चांगला नागरिक म्हणून पाठविण्याची तसेच पुनर्वसन करण्याची जबाबदारी 'कारागृह व सुधारसेवा' विभाग पार पाडत असतो. त्यामुळेच कारागृहे ही जणू एक प्रकारची सुधारगृहेच झाली आहेत. कारागृहातील अपराध्यांना कायदयाचा सन्मान करणा-या चांगल्या नागरिकांत रुपांतरित करण्यासाठी चाललेल्या प्रबोधनाच्या कार्यामुळे शासनाने कारागृह विभागाचे नामकरण "कारागृह व सुधारसेवा" असे केले आहे. सुरक्षितता, शिस्त, सुधारणा, पुनर्वसन, शिक्षण व बंदीचे कल्याण ही 'कारागृह व सुधारसेवा' विभागाची महत्त्वाची कर्तव्ये आहेत. कारागृहातील बंदी सतत सकारात्मक कामामध्ये गुंतून रहावा व त्यांच्यामध्ये असलेल्या कौशल्याचा विकास होत रहावा, यासाठी 'कारागृह व सुधारसेवा' विभागामार्फत सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येतात.

कारागृहातील पुरुष व महिला बंदी शिक्षा भोगत असतांना तथा न्यायाधीन कालावधी व्यतीत करत असतांना त्यांच्या कुटुंबापासून दूर असल्याने ज्या कौटुंबिक समस्या जसे मुलांचे शिक्षण, शेती विषयक कामे कुटुंबातील सदस्यांचे आजारपण याबाबतीत अनेक अडचणी निर्माण होत असल्याने त्यांचे निराकरण होण्याकरीता तसेच बंद्यांना आपल्या कुटुंबाबद्दल सहानुभूती व आपुलकी निर्माण होण्याच्या व शिक्षा भोगून पूर्ण झाल्यानंतर अथवा जामीनावर सुटल्यानंतर कुटुंबातील व्यक्तींनी व समाजाने त्यांना सन्मानाने स्वीकृत करावे. यासाठी कारागृहात असतांना केंद्र शासन पुरस्कृत उपक्रमामार्फत संबंधीत जिल्हयातील अग्रणी बँकेमार्फत घेतलेल्या विविध व्यावसायीक कौशल्य विकास प्रशिक्षणाचा उपयोग करुन बँकेमार्फत कर्ज सुविधा घेवून स्वतःचे पायावर हिम्मतीने उभे राहण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे पुरुष व महिला बंद्यांसाठी विनामूल्य स्वयंरोजगार प्रशिक्षण व कर्ज सुविधेच्या "स्वयंसिध्दा" योजनेचा प्रारंभ करण्यात आला. सदर उपक्रमाबाबत महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरेल आणि कारागृह विभागाचे "सुधारणा व पुनर्वसन" या ब्रीद वाक्याचा उद्देश साध्य होईल. याच धर्तीवर महाराष्ट्रातील सर्व कारागृहात उक्त योजना कार्यान्वीत करण्यात येणार आहे. "स्वयंसिध्दा" या उपक्रमामुळे बंद्यांसाठी नवे पुनर्वसन पर्व सुरु झाले आहे. महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्हयातील अग्रणी बँकेमार्फत त्या जिल्हयात असणा-या कारागृहातील बंद्यांकरीता कौशल्य विकास उपक्रमा अंतर्गत विनामूल्य स्वंयरोजगार प्रशिक्षण सुरु केल्यास व कर्ज सुविधा दिल्यास कारागृहातील बंदी व त्यांच्या कुटुंबाच्या मनावर याचा अत्यंत अनुकूल परिणाम व सकारात्मक बदल होईल.बंदी हा कारागृहातून सुटल्यानंतर स्वतःचे पायावर उभा राहून सन्मानाने जगेल म्हणजेच ख-या अर्थाने सुटकेनंतर त्याचे पुनर्वसन होऊन कारागृहा बाहेरील त्याचे आयुष्य यशस्वी करेल.

चला, आपल्या सर्वांच्या सहभागाने बंदी पूनर्वसनाचा उरोक्त स्वयंसिध्दा उपक्रम यशस्वी रित्या राबवून कारागृह विभागाचा नावलौकिक वाढीसाठी प्रयत्न करु या.

**- अतुलचंद्र कुलकर्णी, भा.पो.से.**

## येरवडा मध्यवर्ती कारागृह

### “परिवर्तन प्रिझन टु प्राईड” या उपक्रमाचे उद्‌घाटन व बंद्यांसाठी खेळ प्रशिक्षण





इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया व कारागृह विभाग यांचे संयुक्त विद्यमाने “परिवर्तन प्रिझन टु प्राईड”हा उपक्रम देशभरात राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणुन दिनांक ०२.१०. २०२१ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृह येथील बंद्यासाठी मा.श्री.अतुलचंद्र कुलकर्णी, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे शुभहस्ते या उपक्रमाचा उद्‌घाटन सोहळा मा. श्री. योगेश देसाई, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे, मा. श्री. अनिर्बन घोष, कार्यकारी संचालक (महाराष्ट्र), इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, श्रीमती राणी भोसले, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह,पुणे,श्रीमती पल्लवी कदम,उपअधीक्षक,श्री.राजेश जाधव, श्री.योगेश परदेशी यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.सदर कार्यक्रमास श्री.श्रीकांत वैद्य, चेअरमन, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांची ऑनलाईन उपस्थिती होती. कारागृहात शिक्षा भोगणा-या बंद्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने त्यांना खेळाचे प्रशिक्षण त्या त्या खेळातील तज्ञ व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली देण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत बंद्यांना व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कॅरम, चेस, बॅडमिंटन या खेळाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. कारागृहातील बंद्यासाठी कॅरम, बुध्दिबळ व व्हॉलीबॉल हे खेळ निवडण्यात आले आहे.या उपक्रमाचा एक भाग म्हणून कारागृहातील २० बंद्यांना बुध्दिबळ व २० बद्यांना कॅरमचे प्रशिक्षण पुणे येथील नामवंत प्रशिक्षक श्री. अनिल मुंढे ( कॅरम), श्री. चेतन खैरे व श्री.सागर मोहिते ( बुध्दिबळ) यांचे मार्फत देण्यात आले. तसेच प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर बंद्यांच्या अंतर्गत स्पर्धा घेण्यात आल्या. सदर प्रशिक्षणाचे श्री.योगेश परदेशी (कॅरम प्रशिक्षक),श्री.जी.के.सरोदे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी,श्री.अंगद गव्हाणे, श्रीमती रजनी मोटके (शिक्षक), श्री. कृष्णा पाडवी (सामाजिक कार्यकर्ता) यांनी यशस्वी आयोजन केले.






## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

### दिवाळी मेळावा-२०२१





दिनांक ३०.१०.२०२१ रोजी मा.श्री.छगन भुजबळ, पालकमंत्री नाशिक जिल्हा यांचे शुभहस्ते कारागृह निर्मित वस्तुंच्या प्रदर्शनाकरीता दिवाळी मेळाव्याचे उद्‌घाटन करण्यात आले.या वेळी मा.पोलीस उप आयुक्त श्री. विजय खरात,सी.आय.एस. एफ कमांडर मा.श्री. के. के. भारव्दाज, पोलीस अधीक्षक ग्रामीण श्री.सचिन पाटील, यांचेसह वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच कारागृह अधीक्षक श्री.प्रमोद वाघ, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री.अशोक कारकर तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता कारखाना तुरुंगाधिकारी श्री. निंबाळकर, श्री.कोळी, कारागृह शिपाई श्री.महाले व श्री.संदिप गवळी तसेच सर्व तांत्रिक निदेशक वृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.



## येरवडा मध्यवर्ती कारागृह

### दिवाळी मेळावा-२०२१



येरवडा मध्यवर्ती कारागृहातील बंदीजनांनी तयार केलेल्या वस्तूंचे दिवाळी सणानिमित्त भव्य प्रदर्शन आणि विक्री केंद्राचे उद्घाटन समारंभ दिनांक २५.१०.२०२१ रोजी मा.श्री.अतुलचंद्र कुलकर्णी,भा.पो.से.अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे शुभहस्ते संपन्न झाला. सदर प्रदर्शनामध्ये कारागृहातील विविध उद्योगामध्ये बंद्यांनी तयार केलेल्या वस्तु ठेवण्यात आलेल्या होत्या.सदर प्रदर्शन व विक्री मेळावा दि.२५.१०.२०२१ ते दि.०३.११.२०२१ दरम्यान ग्राहकांसाठी खुले होते.दिवाळी मेळाव्यास बाहेरच्या ग्राहकांनी उत्तम प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमास मा.श्री.योगेश देसाई,कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग,पुणे, श्रीमती राणी रा. भोसले, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह तसेच इतर अधिकारी/ कर्मचारी वृंद उपस्थित होते.



## नागपूर मध्यवर्ती कारागृह

### दिवाळी मेळावा-२०२१

दिवाळी सणानिमित्त नागपूर मध्यवर्ती कारागृहातील बंदयांनी तयार केलेल्या विविध वस्तुंचे प्रदर्शन व विक्री केंद्राचे उद्घाटन दिनांक २२.१०.२०२१ रोजी मा. श्रीमती स्वाती साठे,कारागृह उपमहानिरीक्षक,पूर्व विभाग, नागपूर यांचे शुभहस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन कारागृह अधिकारी/कर्मचारी यांचे आई-वडील यांना निमंत्रीत करण्यात आले यामध्ये श्री.अशोक यादव, श्रीमती कांताबाई यादव, श्रीमती अनुराधा आगे, श्रीमती सत्यभामा गजभिये,श्री. पंढरी मोहोड हे जेष्ठ नागरीक उपस्थित होते. मा. श्रीमती स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक,पूर्व विभाग, नागपूर व उपस्थित जेष्ठ नागरिक यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुन दिवाळी मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.सदर कार्यक्रमास कारागृहाचे अधीक्षक श्री. अ.म.कुमरे, उपअधीक्षक श्रीमती दिपा आगे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री. संजय गुल्हाने तसेच इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### दिवाळी पहाट कार्यक्रम







दिनांक ०६.११.२०२१ रोजी भास्कर वाघुले म्युझिकल ग्रुप, नागपूर या संस्थेच्या वतीने नागपूर मध्यवर्ती कारागृहातील सिध्ददोष बंदी तसेच अधिकारी/ कर्मचारी यांचेकरिता सकाळी ७.०० वाजता दिवाळी पहाट संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.तसेच दिनांक ०७.११.२०२१ रोजी मैत्री परिवार, नागपूर या संस्थेच्या वतीने देखील न्यायाधिन बंदयांकरीता सकाळी ७.०० वाजता दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात विविध प्रकारची मराठी-हिंदी-गीते तसेच भक्तीगीते सादर करण्यात आली. कारागृहातील बंदयांनी देखील आपली बहारदार गीते या कार्यक्रमात सादर केली. उपस्थित सर्व बंदी तसेच अधिकारी/कर्मचारी यांनी सदर दोन्ही कार्यक्रमांचा आस्वाद घेतला. सदर कार्यक्रमास कारागृहाचे अधीक्षक श्री. अ.म.कुमरे, उपअधीक्षक श्रीमती दिपा आगे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री. संजय गुल्हाने तसेच इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## बंद्यांकरीता नर्सिंग असिस्टंट प्रशिक्षण






मा. श्रीमती स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृह व ट्रासेंडर प्रा.लि. मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कारागृहातील पुरुष बंदयांकरिता नर्सिंग असिस्टंट प्रशिक्षण उद्‌घाटन सोहळा कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २०.११.२०२१ रोजी करण्यात येऊन बंदयांकरीता प्रशिक्षण सुरु करण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रमुख अतिथी व कार्यक्रमाचे उद्‌घाटक म्हणुन मा.डॉ.संजय जायस्वाल, उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर हे उपस्थित होते तसेच प्रमुख अतिथी म्हणुन डॉ संजय पांडे, वैद्यकीय अधिक्षक, इंदीरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर, श्री. समिर जोशी, अध्यक्ष, ट्रासेंडर प्रा.लि.मुंबई, श्रीमती सिमा जोशी, ट्रासेंडर प्रा.लि.मुंबई हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमास कारागृहाचे अधीक्षक श्री अ.म.कुमरे, उपअधीक्षक श्रीमती दिपा आगे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री. संजय गुल्हाने तसेच इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. योगेश पाटील, शिक्षक यांनी केले. सदरचे प्रशिक्षण हे २० बंदयांना देण्यात येत असुन त्याचा दोन महिने कालावधी आहे. या प्रशिक्षणात बंद्यांना तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातुन ऑनलाईन, ऑफलाईन व प्रात्यक्षिकाच्या माध्यमातुन प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

### त्वचा रोग निदान शिबीराचे आयोजन







दिनांक २६.१०.२०२१ रोजी समता फाऊंडेशन मुंबई यांचे विद्यमाने कारागृहातील बंद्यांसाठी त्वचारोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्वचारोग तज्ञांकडुन बंदयांची तपासणी करुन औषधोपचार करण्यात आला. अधीक्षक श्री. प्रमोद वाघ वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री.अशोक कारकर यांचे मार्गदर्शनाखाली मंडल तुरुंगाधिकारी श्री. वैभव आत्रम, श्री. सरपाते तसेच समता फाऊंडेशन समन्वयक श्री प्रल्हाद भरसट यांचे उपस्थितीत आयोजन करण्यात आले होते.

### कायदे विषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन




दि.०८.१०.२०२१ व दि.२९.१०.२०२१ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधीकरण, नाशिक यांचे वतीने कायदे विषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यकमात सन्मा.न्यायाधीश श्री.प्रसाद कुलकर्णी, श्री.रोहन सोनवणे यांनी बंद्यांना जिल्हा विधी सेवा प्राधीकरण यांचेकडुन बंद्यांसाठी पुरविण्यात येणा-या सुविधां विषयी माहिती दिली. सदर कार्यक्रमाचे आयोजन कारागृह अधीक्षक श्री.प्रमोद वाघ वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री.अशोक कारकर यांचे मार्गदर्शनाखाली मंडल तुरुंगाधिकारी श्री.अभिजीत कोळी व श्री.संदिप सरपाते यांचे उपस्थितीत आयोजन करण्यात आले होते.





## ठाणे मध्यवर्ती कारागृह

### कायदे विषयक साक्षरता शिबीर

दि.२२.१०.२०२१ रोजी सन्मा.न्यायाधीश श्री. गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली कारागृहातील बंद्यांसाठी बंद्यांचे हक्क व कायदेविषयक साक्षरता या विषयावर तज्ञ व्यक्तींचे माहिती सत्राचे आयोजन करण्यात आले. दि.२९.१०.२०२१ रोजी जिल्हा विधीसेवा प्राधीकरण, ठाणे यांच्या सहाय्याने सन्मा. सचिव तथा न्यायाधिश श्री. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली कारागृहातील बंद्यांसाठी बंद्यांचे हक्क व कायदेविषयक साक्षरता या विषयावर तज्ञ व्यक्तींचे माहिती सत्राचे आयोजन करण्यात आले.

## औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह

### बंद्यांना स्वेटर वाटप कार्यक्रम





औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह येथे मा. स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद यांचे प्रेरणेने व अधीक्षक, अरुणा मुगूटराव यांचे मार्गदर्शनाखाली भारतीय सेवक संगती,नागपूर याअशासकीय संस्थेच्या मदतीने वयोवृध्द बंदयांना स्वेटर वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास श्री. विलास साबळे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, श्री. बी.डी.श्रीराव, श्री. अमित गुरव, तुरुंगाधिकारी श्री. सुभाष गिते, शिक्षक तसेच मोठया संख्येने कारागृह अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

## येरवडा मध्यवर्ती कारागृह,

### त्वचा रोग तपासणी शिबीर

समता फाऊंडेशन, मुंबई यांचे मार्फत श्रीमती राणी भोसले, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे व डॉ. श्री. संजय मरसाळे, मुख्य वैद्यकीय अधिकारी, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांचे मार्गदर्शनाखली कारागृहातील बंद्यासाठी दिनांक १७.११.२०२१ व दि. १८.११.२०२१ रोजी त्वचा रोग तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. सदरच्या शिबीरासाठी शहरातील नामांकीत डॉ. श्री. रोहन भोसले, डॉ. श्री निखील चव्हाण, डॉ. श्री. दिपक मातकर, यांनी बंद्याची त्वचा रोग तपासणी करून त्यांचेवर औषधोपचार केले. या शिबीराचा कारागृहातील ९६ शिक्षा व ५८४ न्यायाधीन अशा एकुण ६८० बद्यांनी लाभ घेतला. सदर शिबीराचे श्री. जी. के. सरोदे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, व श्री. गिरीष तोरणे, मिश्रक यांनी यशस्वी आयोजन केले.



## धुळे जिल्हा कारागृह वर्ग-१

### कारागृहात दंतचिकित्सा केंद्र

**धुळे जिल्हा कारागृह वर्ग-१ येथील ३५० बंदी तसेच कारागृह कर्मचारी व कुटुंबीय यांचेकरीता दवाखाना विभागमध्ये दंतचिकित्सा केंद्र सुरु करण्यात आले आहे.या करीता जवाहर मेडीकल फाऊंडेशन,धुळे येथील डेन्टल कॉलेजचे डीन डॉ.डोडामनी यांच्या सहकार्याने कारागृहामध्ये दवाखाना विभागातील वैद्यकीय कक्षात दोन डेन्टल चेअर बसविण्यात आल्या असुन त्याकरीता लागणा-या इतर साधन सामग्री रोटरी क्लब ऑफ धुळे फेमिना यांचे अध्यक्ष श्रीमती श्वेता देशपांडे,सचिव श्रीमती रीतू पटवारी,निकीता अग्रवाल यांनी उपलब्ध करुन दिले.सदर उपक्रमां अंतर्गत आठवडयातील प्रत्येक शनिवारी जवाहर मेडीकल फाऊंडेशन दंतचिकीत्सा महाविद्यालय, धुळे येथील ०३ तज्ञ बैद्यकीय अधिकारी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेत कारागृहात येऊन बंदी व कर्मचा-यांची दंतचिकीत्सा करतील, यासाठी औषधोपचार व तपासणी मोफत करण्यात येईल.**




## ठाणे मध्यवर्ती कारागृह

### रस्सीखेच स्पर्धा




टग-ऑफ-वॉर फेडरेशन ऑफ इंडिया (Recognised by - Govt.of India Ministry of Sports,S.A.I.) यांचेद्वारे दि.२१-२३ नोव्हेंबर २०२१रोजी चिंचणी, पालघर, महाराष्ट्र येथे आयोजित 34th Senior Tug of War National Championship (रस्सीखेच) या राष्ट्रीय स्पर्धेत ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे कार्यरत श्री. शशिकांत पांडुरंग पवार,कारागृह शिपाई, यांनी महाराष्ट्राच्या संघाचे संघनायक म्हणून नेतृत्व केले. सदर स्पर्धे मध्ये महाराष्ट्राच्या संघाने अंतिम सामन्या मध्ये अरुणाचल प्रदेश संघाचा पराभव करुन सुवर्ण पदक पटकाविले आहे. त्यांच्या या उत्कृष्ठ कामगिरी करीता श्री. शशिकांत पवार,यांचे कारागृह विभागाकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## ठाणे मध्यवर्ती कारागृह बंदी (कविता)

गुण गातो मी तुरूंगाचा
सुधारणा आणि पुनर्वसनेचा

भिंती त्याच्या उंचच्या उंच
जणु पश्चातापाचे शिखरचं
बंदयामधील मनोवृत्ती आणि
मार्ग बदलतो जीवनाचा १
गुण गातो मी तुरूंगाचा..
सुधारणा आणि पुनर्वसनेचा..

परिवाराशी वंचित होउन
घेतात बंदी स्वतःला कोंडुन
शिक्षे सोबत सदगुण देउन
कल वळवू बुध्दीचा
गुण गातो मी तुरूंगाचा..
सुधारणा आणि पुनर्वसनेचा..

जनतेतील समाज कंटक सारे
गिळुन टाकतो तुरूंग बिचारे
तुरूंगावरिल विश्वास वाढवू
जनतेमधील कायमचा
गुण गातो मी तुरूंगाचा
सुधारणा आणि पुनर्वसनेचा
सुधारणा आणि पुनर्वसन
उद्देश आमचा खुप महान
बिघडुन आलेल्या बंदयाला
देऊ माणूस बनवुन समाजाचा.
गुण गातो मी तुरूंगाचा
सुधारणा आणि पुनर्वसनेचा

शि.विवेकानंद सुतार
ठाणे मध्यवर्ती कारागृह.

### शिकवण आईची

**जिवनाच्या वाटेवर चालता चालता वाट चुकली,**
**माझी कशी भुल पडली मला समाजाची कशी,**
**फुलांचा रस्ता सोडुनिया निघालो काटेरी झुडपामधी,**
**आधार घेऊनी करंगळीच्या आईच्या निघालो होतो स्वप्नांमधी,**
**आई म्हणाली बाळा जाऊ नकोस त्या काटेरी वाटे वरूनी,**
**पण ऐकले नाही मी आईच नि निघालो आड रस्त्यावरूनी,**
**भुल माझी कशी आणि पडलो आज खडयामंधी.**
**आदरणीय लोंकाचे नेहमीच ऐकत जावे**
**व मार्गात चालतांना मागचा पुढचा**
**विचार करूनच पुढे चालावे.**

**सागर वामन मालवकर**
**न्याया.बंदी क्र.८४/९१**
**ठाणे मध्यवर्ती कारागृह**

## बंदीशाळा (कविता)

शाळा भरली बंदयांची
इच्छा त्यांची नसतांना,
किती असतील निरपराध
तर किती अपराधी असताना.

जपतात येथे सर्वजण
आपल्या आपल्या भावना,
कोणी दिसतो नमाज पठण
तर कोणी आरती करताना .

येथे कोणी गरीब
तर कोणी धनवान आहे.
पण या शाळेत प्रत्येक जण
बंदी हा एकच प्रमाण आहे .

अश्रू येतात सर्वानांच
आठवण करत प्रत्येक क्षण,
पण समजवतात ही एकमेकांना
करून आपले मोठे मन.

आठवण येते प्रत्येकाला
आपल्या आपल्या कुंटूंबांची ,
म्हणुनच सारे बघतात वाट
पत्र आणि मुलाखतीची.

आहेत प्रत्येकाच्या ओठांवर
आयुष्याच्याकडू-गोड आठवणी,
सांगतात ऐकमेकांना रडत
त्यांच्या नितळ अश्रूंनी .

म्हणतात ही जागा आहे
सुधारणा आणि पुर्नवसनाची ,
येथूनच सुरुवात होईल
वाल्यातला वाल्मीकीची.

येथे प्रत्येकाला वाटत यावा,
आज माझा जामिन
त्यावर कोणी म्हणतो तथास्तू
तर कोणी म्हणतो आमिन .

येथेच शिकतील सारे
चांगले विचार आणि आचरण,
यासारख्या सत्य संकल्पाचा
दाता नारायण.

कितीही चांगली असली तरी येथे
यायची नाही कोणची इच्छा,
येथूनच प्रारंभ करुया नव्या आयुष्याचा
हिच माझी सदिच्छा.

गणेश सुर्यवंशी
न्याय बंदी क्रंमाक:T-१९/४१४६
बॅरेक नं.१ नविन जेल ठाणे.

परिपत्रक

सुधारणा व पुनर्वसन

महाराष्ट्र शासन, गृह विभाग
महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा

दूरध्वनीक्रमांक ०२०/२६१२४८१५
फॅक्स नंबर-०२०/२६१२५८७८.
Email- igoffice.jud-mh@gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,
यांचेकार्यालय, मध्यवर्तीइमारत,
२ रा मजला, पुणे-४११ ००१

जा.क्र.न्यावि/बंदयाबाबत घ्यावयाच्या दक्षता/७१५६/२०२१,कक्षा-९ (३) दिनांक. २९ .१२.२०२१

Despatched On --------

**परिपत्रक**

**कारागृहात नव्याने दाखल होणा-या बंद्याबाबत घ्यावयाच्या दक्षता.**

असे निर्देशनास आले आहे की, कारागृहात प्रवेश होणा-या बंदयांना गुन्हा घडतेवेळी बाहेरील जमावाने/ व्यक्ती यांचेव्दारे मारहाण वा हिंसा केल्याने बंदी दृष्य व अदृष्य जखमांनी ग्रस्त झालेला असतो सदर नोंदी कारागृहात प्रथम प्रवेश वेळी जखम नोंदवहीत न घेतल्याने व प्रवेशादरम्यान कारागृह वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांची तपासणी न केल्याने बंदी कारागृहात मयत होवुन याबाबत कारागृह प्रशासनावर मानव अधिकार आयोग व सन्मा. न्यायालयाव्दारे गंभीर दखल घेण्यात आली असून बंदयाचे नातेवाईकांच्या तक्रारींना कारागृह प्रशासनाला समोरे जावे लागल्याने काही अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले असल्याने कारागृह प्रशासनाची प्रतिमा मलीन होत आहे.

**अश्या घटना घडु नयेत याकरीता खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहे.**

अ) कारागृह नियमावली १९७९ मधील प्रकरण-२० मधील कैद्याना दाखल करणे, त्यांचे वर्गीकरण व विलगीकरण यामध्ये नमुद वैद्यकीय अधिका-यांची कर्तेव्ये- नियम १६(१) नुसार कार्यवाही करणे.

ब) कारागृह नियमावली १९७९ मधील प्रकरण-१४ मधील एक- दिवसपाळीच्या आज्ञांकित अधिका-याचे कर्तव्य यामधील-१९(ii)(L) नुसार कार्यवाही करणे.

क) प्रिझन अॅक्ट १८९४ प्रकरण चार- प्रवेशावेळी कैद्याची तपासणी करणे यामधील नियम २४(२) नुसार कार्यवाही करणे.

ड) एनएचआरसी यांचेकडील मार्गदर्शक सुचना.

**सर्व अधीक्षकांना बंधनकारक असल्याने त्याचे काटेकोर अनुपालन करावे.**

१. काही कारागृहामध्ये वैद्यकीय अधिकारी यांचे पद कायमस्वरुपी उपलब्ध नसल्याने खालील नमुद दक्षता कारागृह अधिक्षकांनी घेणे गरजेचे आहे.

२. कारागृहात नवीन दाखल होणा-या बंदयाना त्यांचे अंगावरील मारहाणीच्या जखमांच्या नोंदी या जखम नोंदवहीत कर्तव्यावरील आज्ञांकित अधिकारी यांनी झडती अंमलदाराचे

सहाय्याने समक्ष खात्री करुन सविस्तरपणे बंदयास असलेल्या जखमा, इजा, मुका मार, जुन्या जखमेबाबत वा शारिरीक व्यंगाबाबत नोंदी सविस्तरपणे न चुकता घेवुन त्यावर बंद्याची, बंद्यास घेवुन आलेल्या पोलीस पथकाच्या अंमलदाराची, झडती अंमलदाराची किंवा बंदी महिला असल्यास महिला रक्षकांची स्वाक्षरी घेवुन कारागृह वैद्यकीय अधिकारी व कारागृह अधिक्षक यांचे निदर्शनास तात्काळ आणुन देणे (दयावी)

३. आरोपी सायंकाळी बंदीनंतर दाखल झाला असल्यास त्याचे मारहाणहानीचे जखमाबाबत बाहेरील रुग्णालयात केलेल्या प्राथमिक तपासणी अहवालातील केसपेपरवर (वैद्यकीय दाखला) त्याचे अंगावरील दिसणा-या व न दिसणा-या जखमाबाबत नोंदी घेण्यात आल्या आहेत किंवा कसे याची खात्री करणे.

४. तसेच जखमा नसल्यास किंवा वैद्यकीय दाखला २४ तासापुर्वीचा असल्यास त्यास त्याच पोलीस पथकाच्या साहाय्याने पुन्हा संबंधित शासकीय जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी पाठवुन अद्यावत वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त करुन घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

५. जिल्हा कारागृहात बरेच वेळा अपुर्ण अधिकारी यांचे संख्येअभावी कारागृह मुख्य प्रवेशव्दारमध्ये आज्ञांकित अधिकारी ऐवजी कर्मचारी नेमलेले असतात. त्यानुसार वेळोवेळी त्यांना या बाबीचे गांभीर्य सांगण्याची जबाबदारी कारागृह अधीक्षक/ वरिष्ठ तुरुंगाधिकारी/ तुरुंगाधिकारी यांची आहे.

६. तसेच बंदयाची त्याचे कारागृहात दाखल होण्यापूर्वीचे मारहाणीबाबत काही तक्रार असल्यास ती जखम नोंदवहीमध्ये नोंदवुन (लेखी जबाब घेऊन) सदर तक्रारीबाबत संबंधित सन्मा. न्यायालयास अहवाल पुढील चौकशीसाठी सादर करणे गरजेचे आहे.

वरील नमुद सर्व कारागृह नियमावली व कारागृह कायदयातील नियम, वेळोवेळी शासनाने केलेल्या सुचना, कारागृह परिपत्रके व नमुद केलेल्या सुचनांचे अधीक्षक व अधिनस्त अधिकारी/ कर्मचारी यांनी काटेकोरपणे अनुपालन करावे.

परिपत्रक/ आदेशाची नोंद घ्यावी.

(अतुलचंद्र कुलकर्णी)
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

प्रति,
कारागृह अधीक्षक (सर्व)

प्रत:- १) विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई-०८
२) कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम- पुणे/मध्य- औरंगाबाद/पूर्व- नागपुर.

Paripatrak7

सुधारणा व पुनर्वसन

महाराष्ट्र शासन, गृह विभाग
महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा

दूरध्वनी क्रमांक ०२०/२६१२४८१५
फॅक्स नंबर-०२०/२६१२५८७८.
Email- igoffice.jud-mh@gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,
यांचे कार्यालय, मध्यवर्ती इमारत,
२ रा मजला, पुणे-४११ ००१

जा.क्र.न्याबि/उच्चन्या.क्रि.अ.१९५८/२१/ ७३२६ /२०२१,कक्ष-९ (३) दिनांक २६.१२.२०२१

**मा.उच्च न्यायालयीन प्रकरण/परिपत्रक**

विषयः- मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट पिटीशन नं.१९५८/२०२१ Maaysha Singh D/o. Sudha Bharadwaj विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मधील दिनांक २१.०५.२०२१ रोजीचा न्यायनिर्णय

संदर्भः- मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट पिटीशन नं.१९५८/२०२१ मधील दिनांक २१.०५.२०२१ रोजीचा न्यायनिर्णय

संदर्भीय मा.उच्च न्यायालयाचे दि.२१.०५.२०२१ रोजीचा न्यायनिर्णय उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

( अतुलचंद्र कुलकर्णी )
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,
महाराष्ट्र राज्य,पुणे १

**प्रति,**

अधिक्षक, मध्यवर्ती / जिल्हा/ खुले/ महिला (सर्व) खुली वसाहत/ किशोर सुधारालय, नाशिक.

प्रतः- १. विशेष पोलीस महानिरीक्षक, (कारागृह), दक्षिण विभाग, मुंबई.
२. कारागृह उपमहानिरीक्षक (सर्व) यांना माहितीस्तव सादर.

## हायकोर्ट आदेश



### IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
### CRIMINAL APPELLATE JURISDICTION
### WRIT PETITION NO. 1958 OF 2021

Maaysha Singh D/o. Sudha Bharadwaj ... Petitioner

Versus

The State of Maharashtra and another ... Respondents

.........

Dr. Yug Mohit Chaudhary alongwith Payoshi Roy for the Petitioner.
Mr. Anil Singh, ASG for the Union of India.
Mr. J.P. Yagnik, APP for the State.

.........

**CORAM : S.J. KATHAWALLA AND SURENDRA P. TAVADE, JJ.**

DATED : MAY 21, 2021.
(Vacation Court through video-conferencing)

**P.C. :-**

1. The above Petition is filed by the Petitioner through her daughter seeking the following reliefs :

> "(i) Enlarge the prisoner, Mrs. Sudha Bharadwaj on bail either on her Personal Bond, or a low cash or surety bail for the initial period of six months or till such time as the spread of Covid has been contained in Mumbai.
>
> (ii) Pending hearing and adjudication of this Petition, Mrs. Bharadwaj may be released on interim bail.
>
> (iii) For such further and other orders and reliefs as the nature and circumstances of the case may require."

2. The Learned Advocate appearing for the Petitioner informs the Court that since the Petitioner has after filing of the above Writ Petition, received medical

Kanchan P Dhuri

::: Uploaded on - 23/05/2021 ::: Downloaded on - 28/12/2021 12:48:55 :::

treatment, the Petitioner is not pressing the prayer seeking bail on medical grounds. However, he states that the prison Authorities are not giving the Petitioner her medical records and she is also not allowed to make a phone call to the approved family member/s after consultation with the medical officer or after any visit to the hospital.

3. In our view prisoners have a right to obtain their medical records from the prison Authorities under Article 21 of the Constitution of India. In view thereof, all the medical records including medicines prescribed and the test reports shall be provided to the Petitioner on request. In fact, we would go a step further and say that this direction should be followed by the prison Authorities qua all the prisoners. We also agree that the Petitioner should be allowed to make a phone call in the presence of a jail official to the approved family member/s after any of her visits to the hospital. The above Writ Petition is accordingly disposed off.

**( SURENDRA P. TAVADE, J. )** **( S.J. KATHAWALLA, J. )**

## De-Radicalisation in prison या बाबत कार्यशाळेचे आयोजन.






दिनांक २५.११.२०२१ रोजी मा.अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा यांच्या अध्यक्षतेखाली के. के. भवन येथे De-Radicalisation in prison या विषयावर कारागृह अधिका-यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेत मा.अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा यांनी De-Radicalisation in prison या बाबत सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले. तसेच या कार्याक्रमाला उपस्थित असलेले श्री.सुनिल कोल्हे, सह-आयुक्त राज्य गुप्तवार्ता, महाराष्ट्र राज्य,मुंबई, श्री. योगेश देसाई, कारागृह उपमहानिरीक्षक,पश्चिम विभाग, पुणे, डॉ.कुलदीप दाते,मानसशास्त्रज्ञ सल्लागार यांनी सुध्दा सदर विषयांबाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास श्री.एस.व्ही.खटावकर,प्राचार्य,दौलतराव जाधव तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,येरवडा, पुणे, श्री.सुनिल ढमाळ, प्र.कारागृह उपमहानिरीक्षक मुख्यालय,पुणे, श्री. सुभाष अनिरुध्द,उपअधिक्षक,दक्षता पथक तसेच विविध कारागृहाचे एकुण ४० अधिकारी उपस्थित होते.

## कोविड-१९ सहायता शासन मदतनिधी

शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र.४/व्येय-९, दि.२९.०५.२०२० अन्वये कारागृह अधिकारी /कर्मचारी यांचा कोविड-१९ आजाराने कर्तव्य बजावत असताना मृत्यु झाल्याने सदर शासन निर्णयान्वये खालील नमुद अधिकारी/कर्मचारी यांचे कुटूंबियांनी प्रत्येकी रक्कम रु.५० लक्ष सानुग्रह सहाय्य अदा करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | अधिकारी/कर्मचारी यांचे नाव, पदनाम | कार्यालय | मृत्युचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | श्री.भास्कर श्रावण सोनवणे, कारागृह शिपाई | तळोजा मध्यवर्ती कारागृह | ०९/०८/२०२० |
| २. | श्री. महेंद्र भिमराव पगारे, सुतारकाम निर्देशक | अमरावती मध्यवर्ती कारागृह | २५/०८/२०२० |
| ३. | श्री. जगन्नाथ गणपत भोसले, कारागृह शिपाई | विसापूर जिल्हा कारागृह | २९/०८/२०२० |
| ४. | श्री. कैलास कोंडीबा वाघमारे, कारागृह शिपाई | येरवडा मध्यवर्ती कारागृह | १०/०९/२०२० |
| ५. | श्री. भगवान रामकृष्ण शिंदे, कारागृह शिपाई | वाशिम जिल्हा कारागृह | २०/०९/२०२० |
| ६. | श्री.मंगेश सारंगधर कोरेकर, गृह पर्यवेक्षक | किशोर सुधारालय नाशिक | ०२/१०/२०२० |
| ७. | श्री.संजय सदाशिव कांबळे,तुरुंगाधिकारी श्रेणी-१ | बीड जिल्हा कारागृह | ०४/११/२०२० |
| ८. | श्री. सिध्दविनायक गजानन येलगिरे,कारागृह शिपाई | औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह | १४/११/२०२० |



## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

### संविधान दिन साजरा




दि.२६.११.२०२१ रोजी सकाळी १० वाजता संविधान दिन साजरा करण्यात आला.यावेळी अधिक्षक श्री.प्रमोद वाघ, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री. अशोक कारकर, प्रशासन अधिकारी श्री.रविंद्र कोष्टी यांचेसह सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित

होते.अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या वेळी भारतीय संविधाना विषयी महिती देण्यात आली त्यानंतर संविधान उद्देश पत्रिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले तसेच मंडल,दवाखाना,महिला विभागात बंद्यांना शिस्तीत उभे करण्यात आले होते. त्यावेळी त्यांना भारतीय संविधानाची महत्व व व्याप्ती या बद्दल माहिती देण्यात आली. त्यानंतर संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन घेण्यात आले. यावेळी श्री. एच. एस. पोतदार,शिक्षक, श्री. प्रशांत पाटील, तुरुंगाधिकारी उपस्थित होते.

## नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

### कायदे विषयक साक्षरता शिबीर

दिनांक.०९.११.२०२१ रोजी जिल्हा विधीसेवा प्रधिकरण नाशिक यांचे वतीने कायदे विषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यकमात ॲड श्री. राठी यांनी बंद्यांना जिल्हा विधी सेवा प्रधिकरण यांचेकडुन बंद्यांसाठी पुरविण्यात येणा-या सुविधांविषयी माहिती दिली. सदर कार्यकमाचे आयोजन कारागृह अधीक्षक श्री.प्रमोद वाघ वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री.अशोक कारकर यांचे मार्गदर्शनाखाली मंडल तुरुंगाधिकारी श्री.संदिप सरपाते यांचे उपस्थितीत सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



### क्षयरोग माहिती मार्गदर्शन शिबीराचे आयोजन

दि.२७.११.२०२१ रोजी क्षयरोग कक्ष,आरोग्य विभाग,महानगरपालीका, नाशिक यांचे विद्यमाने कारागृहातील बंदयांसाठी क्षयरोग माहिती मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी श्री.भगवान भगत, श्री.अजय जाधव, श्रीमती.निंबाळकर यांनी बंद्यांसाठी क्षयरोग आजार, लक्षणे व उपचार इ. बाबत मार्गदर्शन केले. अधीक्षक श्री. प्रमोद वाघ, वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री. अशोक कारकर यांचे मार्गदर्शनाखाली मंडल तुरुंगाधिकारी श्री. वैभव आत्रम, श्री. प्रशांत पाटील उपस्थित होते.

नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात दिनांक १४.११.२०२१ रोजी पंडीत जवाहरलाल नेहरु यांची जयंती, दिनांक १५.११.२०२१ रोजी बिरसा मुंडा जयंती, दिनांक १९.११.२०२१ इंदिरा गांधी जयंती व गुरुनानक जयंती निमित्त कारागृह अधीक्षक श्री.प्रमोद वाघ यांचे हस्ते प्रतिमा पुजन करण्यात येवुन अभिवादन करण्यात आले. यावेळी वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री. अशोक कारकर यांचेसह सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.कार्यकमाचे नियोजन शिक्षक श्री. हेमंत पोतदार यांनी केले.




### जागतीक मानसिक आरोग्य दिनानिमित्त कार्यक्रम.

नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात दिनांक ०९.१०.२०२१ रोजी जागतीक मानसिक आरोग्य दिनानिमित्त डॉ.श्री ज्ञानेश्वर पवार भोसले, मिलेटरी स्कुल नाशिक यांनी मानसीक आजार व त्यावरील उपाय या विषयी कारागृहातील बंद्यांना मार्गदर्शन केले. अधीक्षक श्री.प्रमोद वाघ वरिष्ठ तुरुंगाधिकारी श्री.अशोक कारकर यांचे मार्गदर्शनाखाली मंडल तुरुंगाधिकारी श्री.संदिप सरपाते यांचे उपस्थितीत सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

---

**मा. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे मान्यतेने प्रकाशित निर्मिती :-श्री.एच.डी. पवार, संशोधन अधिकारी, सहनिर्मिती:-श्री.एस.आर.पाटील,तुरुंगाधिकारी श्रेणी-२, श्री.डी.पी. निरफळ,मुख्याध्यापक,अपर पोलीस महासंचालनालय व महानिरीक्षणालय, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**